REVIEWS OF LITERATURE
ISSN: 2347-2723
IMPACT FACTOR : 3.3754(UIF)
VOLUME - 5 | ISSUE - 5 | DECEMBER - 2017

# माध्यमिक शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थीनींचा परीक्षेतील ताणतणावांचा अभ्यास

**डॉ. सुनिल परशराम पाटील**
सहयोगी प्राध्यापक, धु. ए. सो. चे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, धुळे.

सारांश-


प्रस्तुत संशोधनात माध्यमिक शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थीनीचा परीक्षेतील ताणतणावाचा अभ्यास केला असून याविषयी सद्यस्थिती जाणून घ्यावयाची म्हणून वर्णनात्मक संशोधन पध्दतीतील सर्वेक्षण पध्दतीचा अवलंब केला आहे. १२० माध्यमिक शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थीनींची न्यादर्श म्हणून निवड केली आहे. माहिती संकलन करण्यासाठी डॉ. मधु अग्रवाल आणि श्रीमती उषा कौशल यांची विद्यार्थ्यासाठीची परिक्षा तणाव मापन चाचणीचा अवलंब केला. माहितीचे विश्लेषण व अन्वयार्थ लावण्यासाठी मध्यमान, प्रमाणविचलन व 't' मूल्य या संख्याशास्त्रीय परिमाणांचा अवलंब केला आहे.

**प्रास्ताविक :-**

ताण तणावासंबंधी विचार केला असता तो फक्त मोठ्या लोकांना नसतो तर तो लहानांपासून तर अबाल वृद्धांपर्यंत हा ताण-तणाव जाणवत असतो. प्रचलीत जीवनपध्दती, आकांक्षा आणि क्षमता यात विसंगती निर्माण झाल्यास ताण तणाव निर्माण होतात. थोडयाफार प्रमाणात ताण असणे हे व्यक्तीजीवनाला प्रगतीशील असते. म्हणून थोडाफार ताण असावाच. परंतू हल्ली बालकांपासून ते वृध्दांपर्यंत सर्वचजण अतिताणात आढळतात. त्यामुळे ही अतिशय विचार करण्याची गोष्ट तर आहेच पण त्याच्यावर उपाययोजना करण्याची गरज आहे. व्यक्तीमत्व विकास अपेक्षित दिशेने घडण्यासाठी ताण तणावांचे व्यवस्थापन ही एक आवश्यक गरज वाटते. ताणतणावामध्ये कोणतीही व्यक्ती आपले काम कौशल्यपूर्ण करू शकत नाही. उलट व्यक्ती तणावामध्ये कार्य करत राहिल्यास त्याच्यात विकृती निर्माण होण्याची दाट शक्यता असते व अशातच व्यक्तिचे भविष्य उज्वल न होता अंध:कारमय होऊ शकते. त्यासाठी व्यक्तिमधील ताणावाचे व्यवस्थापन करुन त्यावरील ताण कमी करणे ही गरज निर्माण झालेली होती.

१९३६ मध्ये हॅन्स सेले यांनी ताणाची संकल्पना प्रथमतः मांडली. त्याच्यांमते, "ताण म्हणजे उद्दीपकाला दिलेली प्रतिक्रिया व झालेल्या आंतरक्रिया या घटकांचा परिणाम होय" ताणतणाव ही प्रत्येक व्यक्तीच्या जीवनाशी निगडीत असलेली बाब असून ती अत्यंत व्यापक आहे.कौशल्यपूर्ण शिक्षण ही काळाची गरज असल्यामुळे आजच्या शिक्षण पद्धतीत खूप मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांमध्ये जो ताण-तणाव निर्माण होतो. तो शिक्षण प्रक्रियेमुळेच म्हणजे विद्यार्थ्यांना प्रवेश. आवडीचे शिक्षण, विद्यार्थ्यांना मिळणारे परिक्षेतील गुण एक ना एक अनेक गोष्टीविषयी ताण निर्माण होण्यास शिक्षण प्रक्रिया कारणीभूत ठरते.

**समस्या विधान-** माध्यमिक शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थीनीचा परीक्षेतील ताणतणावाचा अभ्यास करणे.



**उद्दिष्ट**

१. माध्यमिक शाळेतील ग्रामीण व शहरी विद्यार्थीनीचा परीक्षेतील ताणतणावाचा अभ्यास करणे.

२. माध्यमिक शाळेतील ग्रामीण व शहरी विद्यार्थीच्या परीक्षेतील ताणतणावाचा अभ्यास करणे.

३. माध्यमिक शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थीनीचा परीक्षेतील ताणतणावाचा अभ्यास करणे.

**परिकल्पना :** प्रस्तुत संशोधनासाठी वापरलेल्या शून्य परिकल्पना पुढीलप्रमाणे.

१. माध्यमिक शाळेतील ग्रामीण व शहरी विद्यार्थीनीच्या परीक्षेतील ताणतणावाचा मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.
२. माध्यमिक शाळेतील ग्रामीण व शहरी विद्यार्थीच्या परीक्षेतील ताणतणावाचा मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.

**पद्धती -** प्रस्तुत संशोधनात संशोधकाने विद्यार्थी व विद्यार्थीनीच्या परीक्षेतील ताणतणाव जाणुन घ्यावयाचा असल्याने वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब केला आहे.

**जनसंख्या व न्यादर्श-** प्रस्तुत संशोधनातील शहादा तालुक्यातील माध्यमिक शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थीनी हे संशोधनाची जनसंख्या म्हणून निश्चित केले होते. सहेतूक नमुना निवड पद्धतीने एकूण १२० विद्यार्थी व विद्यार्थीनी निवड संशोधनासाठी केली होती.

**संशोधन साधने-** सदर संशोधनात डॉ. मधु अग्रवाल आणि श्रीमती उषा कौशल यांची विद्यार्थ्यासाठीची परिक्षा तणाव मापन चाचणी (Student Examination anxiety Test) ही चाचणी मापन साधन म्हणून वापरले आहे. सदर चाचणीत तणावाची एकूण ३८ विधाने आहेत ती विधाने वस्तूनिष्ठ स्वरुपाची असून प्रत्येक विधानास होय आणि नाही. या दोन पर्यायापैकी एक प्रर्याय समोर बरोबर अशी खुण करावयाची आहे. होय पर्यायाला १ गुण आहे तर नाही पर्यायाला ० गुण आहे. प्रस्तुत चाचणीची विश्वसनियता ०.९२ इतकी आहे. तर सप्रमाणात ०.८९ एवढी आहे.

**संख्याशास्त्रीय परिमाणे-** प्रस्तुत संशोधनात संकलित केलेल्या माहितीचा अन्वयार्थ लावण्यासाठी मध्यमान, प्रमाणविचलन व 't' मूल्य या संख्याशास्त्रीय परिमाणाचा अवलंब केला आहे.

**माहिती विश्लेषण व अन्वयार्थ-** प्रस्तुत संशोधन कार्यात दिलेल्या प्रतिसादाचे विश्लेषण केल्यानंतर पुढील प्रमाणे शून्य परिकल्पनाचे परिक्षण केले होते ते पुढील प्रमाणे.

**परिकल्पना परीक्षण १**
**माध्यमिक शाळेतील ग्रामीण व शहरी विद्यार्थीनीचा परीक्षेतील ताणतणावाचा मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.**

**तक्ता क्र. ०१ माध्यमिक शाळेतील ग्रामीण व शहरी विद्यार्थीनीचा परीक्षेतील ताणतणावाचे मध्यमान, प्रमाणविचलन व 't' मूल्य.**

| विद्यार्थीनी | संख्या | मध्यमान | प्रमाणविचलन | टेबल 't' मूल्य | प्राप्त 't' मूल्य | त्याग/स्वीकार |
|---|---|---|---|---|---|---|
| **ग्रामीण** | ६० | १८.१५ | ४.१७ | १.९९ | १.२ | **स्वीकार** |
| **शहरी** | ६० | १७.२७ | ५.६१ | | | |

**तक्ता क्र.** ०१ नूसार df = ११८ साठी ०.०५ सार्थकता स्तरावर नमुना 't' मूल्य १.९८ आहे व प्राप्त 't' मूल्य १.२ असून ते नमुना 't' मूल्यापेक्षा कमी आहे. म्हणुन शून्य परिकल्पनेचा स्वीकार करावा लागेल.यावरून असे म्हणता येईल की, माध्यमिक शाळेतील ग्रामीण व शहरी विद्यार्थीनीचा परीक्षेतील ताणतणावाचा मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही. माध्यमिक शाळेतील ग्रामीण व शहरी विद्यार्थीनीचा परीक्षेतील ताण तणाव हा समान आहे.

**परिकल्पना ०२: माध्यमिक शाळेतील ग्रामीण व शहरी विद्यार्थीच्या परीक्षेतील ताणतणावाचा मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही.**

**तक्ता क्र. ०२ माध्यमिक शाळेतील ग्रामीण व शहरी विद्यार्थीच्या परीक्षेतील ताणतणावाचा मध्यमान, प्रमाणविचलन व 't' मूल्य.**

| विद्यार्थीनी | संख्या | मध्यमान | प्रमाणविचलन | टेबल 't' मूल्य | प्राप्त 't' मूल्य | त्याग/स्वीकार |
|---|---|---|---|---|---|---|
| **ग्रामीण** | ६० | १६.३३ | ४.८७ | १.९९ | १.२४ | **स्वीकार** |
| **शहरी** | ६० | १५.४५ | ४.९८ | | | |

**तक्ता क्र.** ०२ नूसार df = ११८ साठी ०.०५ सार्थकता स्तरावर नमुना 't' मूल्य १.९८ आहे व प्राप्त 't' मूल्य १.२ असून ते नमुना 't' मूल्यापेक्षा कमी आहे. म्हणुन शून्य परिकल्पनेचा स्वीकार करावा लागेल.यावरून असे म्हणता येईल की, माध्यमिक शाळेतील ग्रामीण व शहरी विद्यार्थीच्या परीक्षेतील ताणतणावाचा मध्यमान गुणांकात सार्थक फरक आढळून येत नाही. माध्यमिक शाळेतील ग्रामीण व शहरी विद्यार्थीच्या परीक्षेतील ताण तणाव हा समान आहे.

## निष्कर्ष

१. माध्यमिक शाळेतील ग्रामीण व शहरी विद्यार्थीनीचा परीक्षेतील ताण तणाव हा समान आहे.
२. माध्यमिक शाळेतील ग्रामीण व शहरी विद्यार्थीच्या परीक्षेतील ताण तणाव हा समान आहे.

## संदर्भग्रंथसूची :

१. छाजेड, विमल .(२००९) स्ट्रेस मॅनेजमेंट गाईड नई दिल्ली :डायमंड पॉकेट बुक्स (प्रा.लि).
२. कदम ,व्ही के. (२०१२) वर्तमान शिक्षण शिक्षक-शिक्षण. नागपूर : विद्या प्रकाशन.
३. कुंटे, माधवी. (२०११) सुदृढ मानसिकतेसाठी. पुणे: डायमंड पब्लिकेशन्स.
४. पंडित, र.वी. (२००६). शैक्षणिक मानसशास्त्र. नागपूर : पिंपळापुरे कं. पब्लिशर्स.
५. मुळे, आणि उमाळे, वि.तु. (१९८७). शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे. नागपुर : महाराष्ट्र साहित्य निर्मीती मंडळ.